संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

जनसंपर्क विभाग

---

एम.ए. मराठीच्या अभ्यासाची विद्यार्थ्यांना उत्तम संधी

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या मराठी विभागाची यशस्वी वाटचाल

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा पदव्युत्तर मराठी विभाग आज एक नावारूपाला आलेला विभाग आहे. मा. कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली या विभागाच्या विकासाची वाटचाल जोमाने सुरू आहे. प्रसिद्ध समीक्षक व वक्ते डॉ. मनोज तायडे यांनी आजवर या विभागाची धुरा समर्थपणे सांभाळली. आज नामवंत साहित्यिक-संशोधक आणि विद्यापीठाच्या अधिसभेच्या मा. सदस्य प्रा. डॉ. मोना चिमोटे यांच्या नेतृत्वात विभाग लक्षणीय प्रगती करीत आहे. एम. ए. (मराठी) भाग-1 व भाग-2 चे नियमित वर्ग, पीएच.डी. साठी अधिकृत संशोधन केंद्र, प्री-पीएच.डी. कोर्स आणि जे.आर.एफ. अंतर्गत संशोधन करणायांसाठी संशोधनाचे महत्त्वाचे केंद्र - अशा उच्च शिक्षणाच्या आणि संशोधनाच्या सोई आज विभागात उपलब्ध आहेत.

मराठी भाषा आणि साहित्याबद्दल सर्वांगीण प्रेम वाढवणारा अभ्यासक्रम, स्पर्धात्मक परीक्षांना पूरक ठरणाया विषयांचा अभ्यासक्रमात समावेश, विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविणाया योजना व उपक्रम, संगणक व इंटरनेट अशा अत्याधुनिक यंत्रणा हाताळण्याची विनामूल्य सोय, अभ्यासपूरक उपक्रमांबरोबरच अभ्यासेतर उपक्रमांवरही भर, व्यक्तिमत्त्व विकासासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन, नेट-सेट-जे.आर.एफ. आणि इतरही स्पर्धात्मक परीक्षांसाठी विशेष वर्गाचे आयोजन, साहित्य अकादेमी (नवी दिल्ली), अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, का.स.वाणी प्रगत मराठी अध्ययन संस्था (धुळे), विदर्भ साहित्य संघ, (नागपूर) यांच्या सहकार्याने विविध कार्यक्रमांचे आयोजन यांमुळे विभागातील वातावरण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला पोषक असे सिद्ध झाले आहे.

संशोधनाच्या क्षेत्रात अग्रेसर असणारा आणि विद्यार्थ्यांना तळमळीने शिकवणारा उच्चविद्याविभूषित पूर्णकालीन शिक्षक-वर्ग ही तर विभागाची मोठीच जमेची बाजू. विभागप्रमुख प्रा. डॉ. मोना चिमोटे यांनी सात ग्रंथांचे संपादन केले असून त्यांना यू.जी.सी.च्या दहाव्या योजनेत रिसर्च अवॉर्ड प्रदान करण्यात आला आहे. त्या अंतर्गत त्यांनी 'विज्ञान कथात्म साहित्य आणि त्याचा समाजावर परिणाम' या विषयावर संशोधन केले. त्यांनी विज्ञान कथेवरही संशोधन प्रकल्प पूर्ण केला आहे. तसेच 'लोककला : माहिती संकलन व संशोधन' हा प्रकल्प सहकार्याने शासनाला सादर केला आहे. त्या अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या केंद्रीय कार्यकारिणीवर राहिल्या असून विदर्भ साहित्य संघ, अमरावती शाखेच्या सांस्कृतिक सचिव आहेत. विद्यापीठाने त्यांना उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्काराने गौरविले आहे. डॉ. मनोज तायडे यांचे सहा ग्रंथ प्रकाशित झाले असून 'आस्वादनामा' या त्यांच्या ग्रंथाला महाराष्ट्र राज्य शासनाचा उत्कृष्ट साहित्यनिर्मिती पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्यांनी 'मेळघाटातील कोरकूंच्या लोकसंस्कृतीचा अभ्यास' या विषयावरील बृहद्शोधप्रकल्प पूर्ण केला आहे. डॉ. मनोज तायडे राज्य मराठी विकास संस्थेकडून प्रकाशित झालेल्या वहाडी शब्दकोश, व-हाडी वाक्प्रचार कोश, वहाडी म्हणींचा कोश या प्रकल्पाचे प्रमुख राहिले आहेत. ख्यातनाम कवी डॉ. विठ्ठल वाघ हे या प्रकल्पाचे मुख्य संशोधक आहेत. डॉ. तायडे कर्नाटकातील येळ्ळूर येथे भरलेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष राहिले असून त्यांच्या 'तुकाराम : व्यक्तित्व व कवित्व' या ग्रंथाचे अंधांसाठी ब्रेललिपीत भाषांतर झालेले आहे. डॉ. माधव पुटवाड आज महाराष्ट्रातील महत्त्वाचे समीक्षक मानले जातात. त्यांचे 'साहित्यातील नवे प्रवाह : आकलन आणि अन्वयार्थ', 'देवधर्म आणि माणूस', 'आकलन', 'अन्वय' , 'समाज आणि साहित्य', 'गाव आणि शिवार' या ग्रंथांसह एकूण आठ ग्रंथ प्रकाशित झाले असून 'कृषी साधनांचा कोश'ही प्रसिद्ध झाला आहे. कोविड काळात डॉ. पुटवाड यांनी अभ्यासक्रमावर आधारित व्हिडिओ तयार करून ते विद्यार्थ्यांना युट्ुब चॅनलवर उपलब्ध करून दिले आहेत. डॉ. हेमंत खडके यांचे दोन ग्रंथ प्रकाशित झाले असून 'अर्वाचीन कवींचा काव्यविचार' या त्यांच्या ग्रंथाला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मयनिर्मितीचा पुरस्कार मिळाला आहे. डॉ. प्रणव कोलते हे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व असून 'अस्तित्ववाद आणि साठोत्तरी मराठी साहित्य' या विषयावर त्यांनी आचार्य पदवी संपादन केली आहे.

विभागाचा एक उल्लेखनीय विशेष म्हणजे एम. ए. (मराठी) च्या अभ्यासक्रमात असणाया सर्व पत्रिकांचे अध्यापन येथे केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना अनेक पर्यायांपैकी आपल्या आवडीचा पर्याय निवडण्याची संधी मिळते. या सर्व पर्यायी पत्रिकांचे अभ्यासक्रम नेट-सेट किंवा स्पर्धा परीक्षा डोळ्यासमोर ठेवून तयार केलेले आहेत. आजच्या काळात विद्यार्थ्याला केवळ अभ्यासक्रमावर भर देऊन चालत नाही. त्याला ज्ञानाच्या क्षेत्रात चौफेर दक्ष रहावे लागते. यासाठी विभागातर्फे अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. नामवंतांची व्याख्याने, विविध विषयांवरच्या कार्यशाळा, विविध स्पर्धा, मुलाखती, उत्तमोत्तम माहितीपट, चित्रपट, यांचे प्रदर्शन - अशा उपक्रमांचा विद्यार्थ्यांना येथे लाभ मिळवून दिला जातो. विभागाच्या विविध उपक्रमांमध्ये आजवर सर्वश्री निळू फुले, कवी ग्रेस, भालचंद्र नेमाडे, रंगनाथ पठारे, गंगाधर पानतावणे, भा. ल. भोळे, द. ता. भोसले, आ. ह. साळुंखे, राजन गवस, वसंत आबाजी डहाके, नागनाथ कोत्तापल्ले, प्रभा गणोरकर, वासुदेव मुलाटे, प्रकाश आमटे, विठ्ठल वाघ, फ. मु. शिंदे, दत्ता भगत, दासू वैद्य अशा नामवंतांनी हजेरी लावली आहे. विभागाने आजवर अनेक महत्त्वाच्या विषयांवरील राष्ट्रीय चर्चासत्रांचे यशस्वी आयोजन केले आहे. गेल्या सात वर्षांपासून विभागातर्फे 'कवी केशवसुत काव्य'स्पर्धेचे आयोजन केले जाते. नवोदित लेखकांसाठी विभागाने सेमाडोह येथे कथालेखन आणि शहानूर येथे कवितालेखन (निवासी)कार्यशाळांचे यशस्वी आयोजन केले आहे. विभागातर्फे तिसया अखिल भारतीय वहाडी साहित्य संमेलनाचे आणि लोककला महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.

विभागात विद्यार्थ्यांसाठी कलात्मक चित्रपट, नाटके, गीते यांच्या चित्रफिती, ध्वनिमुद्रिका, यांचा उल्लेखनीय संग्रह आहे. त्यांना इंटरनेट-संगणक या सुविधांसह सेट-नेट, जे.आर.एफ. आणि इतरही स्पर्धापरीक्षांसाठी यथोचित मार्गदर्शन केले जाते. विभागाचे सतरा विद्यार्थी सेट-नेट परीक्षा उत्तीर्ण असून गेल्या अनेक वर्षांपासून विद्यापीठाच्या गुणवत्तायादीत प्रथम स्थानी झळकण्याचा मान मिळवण्याची परंपरा विभागाच्या विद्यार्थ्यांनी कायम ठेवली आहे. विभागाचे अनेक विद्यार्थी विविध महाविद्यालये आणि कार्यालयांमध्ये उच्चपदस्थ स्थानांवर कार्यरत आहेत. पत्रकारिता, आकाशवाणी, दूरदर्शन, शासकीय कार्यालये आणि शाळा अशाही ठिकाणी या विभागाचे विद्यार्थी यशस्वीपणे वावरत आहेत.

---

प्रति, जनसंपर्क विभाग

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. 29/10/2021.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**

जनसंपर्क अधिकारी